**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्र्यांच्या हस्ते बिहारमधे ५ हजार ९०० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांची पायाभरणी आणि लोकार्पण

- ११व्या आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त आयोजित योगसंगमात नोंदणी करणाऱ्यांची संख्या १० लाखांच्या वर

- कैलास मान सरोवर यात्रा आजपासून सिक्कीम इथून सुरु

- भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या तेंडुलकर-अँडरसन चषक क्रिकेट कसोटी मालिका आजपासून सुरु होणार

**आणि**

- ज्येष्ठ अभिनेते विवेक लागू यांचं निधन

**<><><><>**

बिहार ही राजेंद्र प्रसाद, ब्रजकिशोर प्रसाद यांच्यासारख्या देशाच्या महान सुपुत्रांची भूमी असून आपलं रालोआ सरकार त्यांचा वारसा पुढे नेत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज बिहार राज्याच्या दौऱ्यावर असून, त्यांनी बिहारमध्ये सिवान इथून ५ हजार ९०० कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचं दूरस्थ पद्धतीने उद्घाटन आणि पायाभरणी केली. यामध्ये विविध नवीन रेल्वे गाड्यांचं उद्घाटन, प्रधानमंत्री घरकुल योजना, नमामि गंगे योजनेअंतर्गत ६ मलनिःसारण प्रकल्पांचं उद्घाटन इत्यादी विकासकामांचा समावेश आहे. वैशाली देवरिया रेल्वे प्रकल्पाची पायाभरणी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाली.

आपल्या सरकारने महिलांसाठी आरक्षण, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, रस्ते वाहतूक अशा विविध क्षेत्रात काम करून बिहारचा विकास केल्याचं बिहारचे मुख्यमंत्री नीतिश कुमार यावेळी म्हणाले.

**<><><><>**

प्रधानमंत्री आज ओदिशा दौऱ्यावर जाणार असून भाजपाच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त भुवनेश्वर इथे आयोजित विशेष कार्यक्रमाला ते उपस्थित राहणार आहेत. यावेळी त्यांच्या हस्ते ओदिशामधल्या १८ हजार सहाशे कोटींपेक्षा जास्त खर्चाच्या विकासकामांचं उद्घाटन आणि पायाभरणी होणार आहे.

**<><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज डेहराडूनमध्ये राष्ट्रपती निकेतन आणि राष्ट्रपती तपोवनचं उद्घाटन केलं. तसंच राष्ट्रपती निकेतनमधल्या अनेक विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि राष्ट्रपती उद्यानाची पायाभरणी ही राष्ट्रपती मुर्मू यांनी केली. राष्ट्रपती उद्यान ही बाग १३२ एकरवर विकसित केली जाणार आहे. राष्ट्रपती निकेतन आणि तपोवन येत्या २४ तारखेपासून जनतेसाठी खुले होणार आहेत. या वेळी राष्ट्रपती मुर्मू यांनी राष्ट्रीय दृष्टिहीन दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरण संस्थेच्या विद्यार्थ्यांनाही संबोधित केलं.

**<><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या वाढदिवसानिमित्त आज हिमाचल प्रदेशचे अनेक ज्येष्ठ नेत्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><>**

अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन उद्या २१ जूनला साजरा होणार आहे. आयुष मंत्रालयानं विशाखापट्टणम इथं आयोजित केलेल्या मुख्य समारंभामध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी योग प्रात्यक्षिकांमधे भाग घेणार आहेत. सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीनं देशभरातील १०० पर्यटन स्थळांवर योग दिन साजरा करण्यात येणार आहे. दरम्यान, आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर आकाशवाणीला दिलेल्या विशेष मुलाखतीत, केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी योग ही एक जीवनशैली आहे असं सांगत योगाभ्यासाचा दैनंदिन जीवनात समावेश करण्याचं आवाहन केलं आहे....

- **- होल्ड - बाईट - २४ सेकंद - प्रतापराव जाधव -**

(योग एक कुछ एक दिन का इवेंट नहीं योग को अपनी जीवनशैली बनाना चाहिए और हमारे प्रधानमंत्री ने भी ये संदेश दिया है कि योग को अपनी जीवनशैली बनाओ अपने जीवन में योग को स्थान दो और योग के माध्यम से तंदुरुस्त रहो आप तो खुद योगा हर रोज करो योगा के

लिए समय दो लेकिन आपके परिवार में जो भी लोग हो बुजुर्ग हो माता बहने हो बच्चे हो सभी को योगा करने के लिए प्रवर्तन करें।

दरम्यान, उद्याच्या विशाल योगसंगम कार्यक्रमासाठी देश- विदेशातून नोंदणी करणाऱ्या योग अभ्यासकांची संख्या १० लाखांच्या पुढे गेली आहे.

<><><><>

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज सौदी अरेबियाचे परिवहन मंत्री सलेह अल जास्सर यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. रस्ते आणि रेल्वे वाहतूक क्षेत्रातल्या सहकार्याबद्दल उभयपक्षी हिताच्या मुद्द्यांवर त्यांनी विचारविमर्श केला. रशियात सेंट पीटर्सबर्ग इथं सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेसाठी सध्या अश्विनी वैष्णव रशियाच्या दौऱ्यावर आहेत. वैष्णव यांनी काल रशियाचे उपप्रधानमंत्री एलेक्सी ओवरचुक यांची भेट घेऊन विविध विषयावर चर्चा केली. यावेळी भारत आणि रशिया दरम्यान मुख्यतः परिवहन, संपर्क यंत्रणा, पायाभूत सुविधा आणि दुर्मिळ धातू या क्षेत्रात परस्पर सहकार्य वाढवण्याबाबत चर्चा झाली.

<><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्तानं आयोजित राष्ट्रीय परिसंवादात सहभागी होणार आहेत. तसंच महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चरच्या नव्या मुख्यालयाचं उद्घाटनही शहा यांच्या हस्ते आज होणार आहे. अमित शहा यांनी काल बेंगळुरूमध्ये भाजपचे ज्येष्ठ नेते आणि कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बी.एस. येडियुरप्पा यांची भेट घेतली. आदिचुंचनागिरी विद्यापीठाच्या बेंगळुरू इथल्या संकुलाचं उद्घाटन आज शहा यांच्या हस्ते झालं.

<><><><>

विविध कारणांसाठी मायदेशाहून विस्थापित झालेल्यांच्या सन्मानासाठी पाळला जाणारा जागतिक विस्थापित दिन आज आहे. आपल्या मायदेशातून विस्थापित झालेल्यांच्या शक्तिचा आणि धैर्याचा सन्मान करण्याचा आजचा दिवस आहे. या दिवसाची यंदाची संकल्पना निर्वासितांसोबत एकता अशी आहे. या दिवसाच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून UNHCR इंडियानं काल नवी दिल्ली इथल्या युनेस्को मुख्यालयात एक कार्यक्रम आयोजित केला होता.

<><><>

कैलास मान सरोवर यात्रा आजपासून सिक्कीम इथून सुरू झाली. सिक्कीमचे राज्यपाल ओमप्रकाश माथुर यांनी आज सकाळी नथु ला मधून जाणाऱ्या ३६ यात्रेकरूंच्या पहिल्या तुकडीला हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. या तुकडीत ४३ ते ६९ वर्ष वयोगटातले सदस्य असून त्यातल्या १३ महिला आहेत. ही तुकडी ११ ते १२ दिवसात यात्रा पूर्ण करुन गंगटोकला परत येईल. नथु ला खिंडीच्या दुसऱ्या टोकाला चीनच्या अधिकाऱ्यांनी यात्रेकरुंचं स्वागत केलं. तिबेटच्या स्वायत्त प्रदेशातली कैलास मानसरोवर यात्रा पाच वर्षांच्या कालावधीनंतर यंदा होत आहे.

<><><>

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरील अॅक्सिओम-४ ही मोहीम पुन्हा पुढे ढकलण्यात आली आहे. यापूर्वी ही मोहीम २२ जून रोजी प्रक्षेपित होणार होती. नासाचे माजी अंतराळवीर आणि अॅक्सिओम स्पेसमधील मानवी अंतराळ उड्डाण संचालक पेगी व्हिटसन या मोहिमेचे नेतृत्व करणार आहेत  तर भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे अंतराळवीर शुभांशू शुक्ला पायलट म्हणून काम करणार आहेत. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या कामकाजाचे मूल्यांकन करण्यासाठी अंतराळ संस्थेला अतिरिक्त वेळेची आवश्यकता असल्यानं ही मोहीम पुढे ढकलण्यात आली आहे, असं नासानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

<><><>

एअर इंडियानं तांत्रिक आणि देखभालीच्या कारणामुळे अनेक आंतरराष्ट्रीय विमान फेऱ्या रद्द करायचा निर्णय घेतला आहे. विमानाच्या उड्डाणापूर्वी अतिरिक्त सुरक्षा खबरदारी घेणं, तसंच मध्य पूर्वेत हवाई सीमा बंद झाल्यामुळे वाढलेल्या फेऱ्या लक्षात घेऊन बोइंग ७८७ आणि ७७७ या विमानांच्या फेऱ्या कमी करायचा निर्णय घेतल्याचं एअर इंडियानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

<><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या तेंडुलकर-अँडरसन चषकाच्या पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिली क्रिकेट कसोटी आज इंग्लंडमधल्या हेडिंग्ले, लीड्स इथं होणार आहे.

हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी साडे तीन वाजता सुरू होईल. नवनियुक्त भारतीय कर्णधार शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ खेळणार आहे.

दरम्यान, काल अनुभवी खेळाडू जेम्स अँडरसन आणि सचिन तेंडुलकर यांच्या उपस्थितीत अँडरसन-तेंडुलकर चषकाचं अनावरण करण्यात आलं.

**<><><><>**

मराठी मनोरंजन सृष्टीतले ज्येष्ठ अभिनेते विवेक लागू यांचं काल निधन झालं. ते ७१ वर्षांचे होते. उमदं देखणं व्यक्तिमत्व आणि प्रभावी आवाज याच्या जोरावर त्यांनी रंगमंच आणि रुपेरी पडद्यावर अनेक भूमिका रंगवल्या. लेखन, दिग्दर्शन क्षेत्रातही त्यांनी काम केलं. शिवाय संगीतातही त्यांची रुची होती. त्यांच्या निधनानं मराठी सिनेसृष्टीवर शोककळा पसरली आहे.

**<><><><>**

छत्तीसगडमध्ये आज सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत एक महिला नक्षलवादी ठार झाली. कांकेर जिल्ह्यातल्या अमाटोला आणि कालपर भागातल्या जंगलात ही चकमक झाली.

**//<><><><>//**